


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७२४ . वा | रविवार दि. ३१ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्ह्यात शिवसेनेने दिला भाजपला चेकमेट...

## गायकवाड-प्रतापरावांच्या खेळीत भाजप क्लीन बोल्ड...

## भाजप नेतृत्वाला आपल्याच कार्यकर्त्यांच्या भावनेचा आदर नाही का?

**भाग-18**

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रतापराव जाधव यांना महायुतीकडून बुलढाणा लोकसभेची उमेदवारी घोषित झाली आणि या विषयावरून गेल्या काही दिवसांपासून असलेल्या सस्पेन्सवर पडदा पडला. परंतु हा पडदा अनेक प्रश्नांना जन्म देऊन गेला. यात सर्वांत महत्वाचा मुद्दा आता उरतो की, संजय गायकवाड आणि प्रतापरावांनी बुद्धिबळाच्या सारीपाटावार अशा काही गोट्या रचून ठेवल्या की, त्यात जिल्हा भाजप पूर्णपणे चेकमेट झाली. यासंदर्भात खुलासे खुद्द संजय गायकवाड यांनी केल्याने स्थितती आणखीन स्पष्ट होऊ शकली. परंतु यात महत्वाचा प्रश्न उरतो की, भाजपने या ठिकाणी शिवसेनेकडून मात कशी खाल्ली. भाजपमध्ये नेमकं चाललंय काय? काल महायुतीचा बुलढाण्यात जो मेळावा झाला, त्यात संजय गायकवाड यांनी आपल्या उमेदवारी अर्ज टाकण्याच्या घटनेसंदर्भात स्वतःच खुलासा केला. ते म्हणाले की, माझे अर्ज दाखल करणए ही एक स्ट्रॅटेजी होती आणि ती यशस्वी झाली. कारण मी दुपारी अर्ज दाखल केला आणि सायंकाळी प्रतापरावांना उमेदवारी घोषित झाली. मला लोकसभेची निवडणूक मुळीच लढवायची नाही. मी पक्षाकडे तशी मागणी देखील केली नाही. या वक्तव्यावरून हे स्पष्ट आहे की, गायकवाडांचे अर्ज दाखल करणे ही अत्यंत विचारपूर्वक केलेली कृती होती. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून बुलढाण्याच्या जागेची जोरदारपणे मागणी केली जात होती. शिवसेना दुभंगल्यानंतर आता तरी ही जागा आपल्याला मिळेल, अशी भाबडी अपेक्षा भाजप कार्यकर्त्यांची होती.

गेल्या १५ वर्षांमध्ये प्रतापरावांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची घोर उपेक्षा केली आहे. परंतु भाजपचे शिस्तबद्ध कार्यकर्ते केवळ पक्षादेश म्हणून प्रतापरावांचे कार्य करीत राहिले. परंतु या वेळी भाजप कार्यकर्त्यांच्या धीर पूर्णपणे सुटला होता. त्यांना काहीही करून ही जागा हवी होती. त्यादृष्टीने भाजपचे प्रयत्न देखील सुरू होते. मात्र, भाजपकडून बुलढाण्याची जागा घेण्यासाठी अत्यंत कुर्मगतीने हालचाली केल्या, त्यामुळेच प्रतापराव बाजी मारून गेले, हे सिद्ध आहे. प्रश्न महत्वाचा उरतो की ज्या पक्षात अनेक चाणक्य आहेत, राजकीय मुत्सद्देगिरी करणारे भरपूर आहेत, तो पक्ष शिवसेना शिंदे गटातून चेकमेट कसाकाय होऊ शकतो. या प्रकारावरून आणखी एक स्पष्ट होते की, जिल्ह्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना समजून घेण्यात पक्षश्रेष्ठी कुठेतरी कमी पडले. किंबहुना पक्षश्रेष्ठींना भाजप कार्यकर्त्यांच्याशी भावनांशी काहीही घेणे-देणे नसल्याचे दिसते. महायुतीच्या मेळाव्यात उपस्थित असलेले भाजपचे आमदार संजय कुटे यांनी जे वक्तव्य केले, ते वक्तव्य तर अनेक भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना देखील पटले नसावे. त्याचे कारण म्हणजे कुटे यांचे वक्तव्य हे भाजप कार्यकर्त्यांच्या तीव्र भावनांचा अनादर करणारे आहे. कुटे यांनी सांगितले की, त्यांना एक महिन्यापासून माहिती होते की, प्रतापरावांनाच लोकसभेची उमेदवारी मिळणार आहे आणि ती मिळाली देखील. म्हणजे एकीकडे भाजपचे असंख्य कार्यकर्ते, भाजपचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी हे प्रतापरावांना उमेदवारी देऊ नका, अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे करीत असताना कुटे यांना देखील आपल्याच कार्यकर्त्यांच्या भावनांचा चाळ घेता आला नाही का? प्रतापरावांविषयी जनतेत जो रोष आहे, प्रतापरावांनी जिल्ह्याच्या विकासाची जी काही वासलात लावली, त्याबद्दल कुटे यांना काहीही देणे घेणे नाही, असे दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वी भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांनी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनशी बोलताना सांगितले होते की, बुलढाण्याची जागा भाजप घेण्याचा जोरदारपणे प्रयत्न करीत आहे. मग कमीत कमी हे वाक्य बोलताना संजय कुटे यांनी आपल्याच पक्षाच्या जिल्हाध्यक्षांच्या वक्तव्याचा विचार केला नसावा,असे दिसते. भाजप पक्षश्रेष्ठी आपल्याच कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करीत नसल्याचेही यावरून स्पष्ट होत आहे. कारण बुलढाण्यासारखीच स्थिती अमरावतीत देखील आहे. ज्या रवी राणा यांनी एकेकाळी भाजपचे कार्यालय फोडले होते, भाजप कार्यकर्त्यांना मारहाण केली होती,




त्याच रवी राणांच्या पत्नी नवनीत राणा यांना भाजपने उमदेवारी दिली. त्या ठिकाणीही भाजप कार्यकर्त्यांनी काहीही झाले तरी नवनीत राणा यांना भाजपकडून उमेदवारी देऊ नका, अशी जोरकस मागणी पक्षश्रेष्ठींकडे केली होती. परंतु पक्षश्रेष्ठींनी काहीही ऐकले नाही व त्यांनी नवनीत राणा यांच्याच गळ्यात उमेदवारीची माळ घातली. त्या ठिकाणच्या भाजप कार्यकर्त्यांची जशी अवस्था झाली आहे, तशीच अवस्था आज बुलढाण्यातील भाजप कार्यकर्त्यांची झाल्याचे दिसून येत आहे. भाजपचे कार्यकर्ते फक्त पक्षाच्या आदेशालाच महत्व देतात, असे अनेकदा भाजपचे नेते सांगत असतात. परंतु मग भाजप कार्यकर्त्यांची ही शिस्तबद्धता भाजप पक्षश्रेष्ठी चक्क गृहित धरत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. परंतु भाजपला याचा फटका नक्कीच या निवडणुकीत बसू शकतो, याचाही विचार पक्षश्रेष्ठींनी करणे गरजेचे आहे. आता तो विचार होत असेल की नाही किंवा होईल की नाही, हे येणारा काळच दाखवू शकेल.

# विवाहितेचा केला शारीरीक व मानसिक छळ सासरच्या ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल...

**जनसंचलन/मेरा बु.**

विवाहितेचे एक वर्षापूर्वी लग्न झाले आणि ९ महिन्याची गरोदर असतांना सासरच्या मंडळींनी पैशासाठी शाररिक व मानसिक छळ करुन मारहाण केली. अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेळगाव आटोळ येथील सुभाष रामराव मोरे यांच्या मुलीचे लग्न आत्माराम सिताराम गायकवाड रा. हिवरा काबली ता. जाफराबाद जि. जालना यांचा मुलगा अमोल याच्या सोबत समाजांच्या रितीरिवाजानुसार १७ मार्च २०२३ रोजी झाले होते. सदर महिला ही ९ महिन्याची गरोदर आहे. पती व सासू-सासरे तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तुझ्या माहेरवरुन ५० हजार रुपये घेवून ये असे म्हणत होते. परंतु तिच्या आई वडिलांची परिस्थिती हलाखीची असल्याने पैसे देवू शकत नव्हती. त्यामुळे तीचे पती सासू सासऱ्याचे तिला वागविण्यास नकार देत शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत पैसे आणले नाही. तर तुला मारुन टाकू अशी धमकी देत माहेरी हाकलून दिले. मुलीच्या आई वडिलांनी पंच मंडळी व नातेवाईक बोलावून समजावून सागितले. परंतु तीच्या पती व सासू सासरे यांनी वागविण्यास स्पष्ट नकार दिला त्यामुळे सौ. आरती अमोल गायकवाड वय २४ वर्ष हिचे तक्रारी वरुन अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डायरी अंमलदार वाघ यांनी ३० मार्च रोजी आरोपी पती अमोल आत्माराम गायकवाड, सासरे आत्माराम सिताराम गायकवाड, सासू कविता आत्माराम गायकवाड, ननंद ज्योती आत्माराम गायकवाड, सिताराम गायकवाड सर्व राहणार हिवरा काबली ता. जाफराबाद जि. जालना, मनीषा रवी मोरे, रवी मोरे रा. शिरपूर चिखली जि. बुलढाणा या ७ आरोपी विरुध्द अप न.- ०९०/२०२४ कलम ४९८ (अ) ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवी नुसार गुन्हा दाखल करुन तपास बिट जमादार सोनकांबळे यांच्याकडे सोपविला आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा क्षयरोग केंद्र येथे जागतिक क्षयरोग दिन साजरा

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा क्षयरोग केंद्र येथे जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जनजागरण कार्यक्रम पार पडला. यावेळी क्षयरोगाबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. डी. व्ही. खेरोडकर, डॉ. शिवदास सरोदे उपस्थित होते. डॉ. गुट्टे यांनी सन २०२५ पर्यंत क्षयरोग संपण्याकरीता आवाहन केले. डॉ. शिवदास सरोदे यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा पर्यवेक्षक अनिल सोळंके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिवदास सरोदे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी जिल्हा पीपीएम समन्वयक सिद्धेश्वर सोळंकी, जिल्हा समन्वयक आशिष वाईनदेशकर, मुकेश धेंगे, आर. व्ही. सुरडकर दीपक बाभुळकर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ दिनकर सोळंकी, एन. आर. शेख, साहेबराव आंभोरे, राजू सरोदे, पुरुषोत्तम सोळंकी, श्री. ताठे, श्री. धदर, श्री, वैष्णव,



वैशाली पवार, उर्मिला जाधव, श्री. जयस्वाल. वैभव धदर, तसेच आयसीटीसी व एआरटी तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

# निवडणूक खर्च निरीक्षक अमित शर्मा यांनी घेतला आढावा

जनसंचलन/बुलढाणा


येत्या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून भारतीय रेल्वे लेखा सेवेतील अमित शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी गुरुवारी, दि. २८ मार्च रोजी आढावा घेतला. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ रोजी घोषित केला आहे. त्यानुसार ०५ बुलढाणा लोकसभा मतदार संघासाठी दुसऱ्या टप्प्यात दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चावर लक्ष्य ठेवण्यासाठी निवडणूक खर्च निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने अमित शर्मा यांची निवडणूक खर्च निरिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. ते दि. २८ मार्च २०२४ रोजी जिल्ह्यामध्ये दाखल झालेले आहेत. त्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील खर्चविषयक कामाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी विविध विषयांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या खर्चविषयक नोडल अधिकारी यांची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून निष्पक्ष आणि निर्भय वातावरणात मतदान पार पाडण्यासाठी पोलिस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेली कारवाई, तसेच उपाययोजनांची माहिती घेतली. निवडणूक काळात मतदारांना प्रलोभन दाखवण्यासाठी कपडे, दारू, तसेच पैशाची वाहतूक होऊ शकते. सोशल मिडीयावर होणारा प्रचार पाहता त्याबाबत खर्चाची नियमित माहिती माध्यम कक्षाने दैनंदिन स्वरूपात ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानंतर निरीक्षक श्री. शर्मा यांनी जिल्हास्तरावरीय नियंत्रण कक्षाला भेट दिली. तसेच लोकसभा मतदारसंघ निवडणूक निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयानी कार्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

# लोकसभेसाठी जिल्ह्यातील २ हजार २६६ मतदान केंद्रावर मतदान...

जनसंचलन/बुलढाणा

येत्या लोकसभा निवडणुकीसाठी दि. २६ एप्रिल रोजी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात २ हजार २६६ मतदान केंद्रावर मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ प्रसिद्ध केला आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी बुलडाणा जिल्ह्यात एकुण ७ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यामध्ये एकुण २ हजार २६५ मतदान केंद्रे असून २६-खामगाव विधानसभा मतदारसंघामध्ये ५३ ए खामगाव ग्रामीण हे १ सहायकारी मतदान केंद्र तयार केल्याने एकूण मतदान केंद्रांची संख्या २ हजार २६६ झाली आहे.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी ०५ बुलढाणा लोकसभा मतदारसंघामध्ये २१-मलकापूर वगळता ६ मतदारसंघाचा समावेश होतो. त्यामध्ये १ हजार ९६२ मतदान केंद्रे आहेत. २१-मलकापूर हा मतदारसंघ लोकसभा निवडणूकीसाठी ०४-रावेर लोकसभा मतदार संघामध्ये समाविष्ठ असून त्यामध्ये ३०४ मतदान केंद्र आहेत. मलकापूर विधानसभा मतदारसंघात शहरी ९०, ग्रामीण २१४ अशी एकूण ३०४, बुलढाणा विधानसभा मतदारसंघात शहरी ७८, ग्रामीण




२५३ अशी एकूण ३३१, चिखली विधानसभा मतदारसंघात शहरी ४९, ग्रामीण २६३ अशी एकूण ३१२, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात शहरी ३७, ग्रामीण २९९ अशी एकूण ३३६, मेहकर विधानसभा मतदारसंघात शहरी ५९, ग्रामीण २९० अशी एकूण ३४९, खामगाव विधानसभा मतदारसंघात शहरी ७८, ग्रामीण २४१ अशी एकूण ३१९, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात शहरी ८१, ग्रामीण २३४ अशी एकूण ३१५ असे लोकसभा मतदारसंघात शहरी ४७२, ग्रामीण १ हजार ७९४ अशी एकूण २ हजार २६६ मतदान केंद्र राहणार आहे. एकूण मतदान केंद्रापैकी आदर्श मतदान केंद्र तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये विधानसभानिहाय प्रत्येकी ७ मतदान केंद्राचा समावेश राहणार आहे. या आदर्श मतदान केंद्रात महिलांचे ७, दिव्यांग ७, युवांचे ४२ असे एकूण ५६ आदर्श मतदान केंद्र राहणार आहे. लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये ४० टक्क्यांपेक्षा कमी आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालेले मतदान केंद्र, लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये २५-मेहकर मतदारसंघातील फेरमतदान झालेले १२०-डोणगाव हे मतदान केंद्र आणि २५-मेहकरमधील ७८-रत्नापूर (लावणा), २७-जळगाव जामोद मधील ३-भिंगारा असे एकूण ३ क्रिटीकल मतदान केंद्र आहेत. तसेच इतर १ हजार १३९ मतदान केंद्रावर वेबकास्टींग करण्यात येणार आहे. तसेच सर्व मतदान केंद्रावर रॅम्प, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, वीज आणि दिशादर्शक चिन्हे आदी आवश्यक सर्व सोईसुविधा पुरविण्यात येणार आहे.


## प्रादेशिक परिवहन ३१ मार्चला कर वसुली करणार

जनसंचलन/बुलडाणा

नवीन वाहन नोंदणी व करवसुलीचे कामकाजाद्वारे प्रादेशिक परिवहन विषयक कामकाज, थकीत कर वसुली व खटला विभाग महसुल जमा होणारे कामकाज सुरु ठेवण्यात आले आहे. त्यानुसार वाहनधारकांना दि. ३१ मार्च २०२४ रोजी सुट्टीच्या दिवशी महसूली कर जमा करता येणार आहे.




याची नागरिकांनी नोद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मतदार जागृतीसाठी जिल्ह्यात ९६५ व्होटर अवेयरनेस फोरम...

## लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सशक्त मतदार काळाची गरज-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकशाही केंद्रीत राजकीय व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी निष्पक्ष, भयमुक्त व शांततापूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी नैतिक मुल्याधारीत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नागरिकांना सशक्त मतदार म्हणून घडविण्यासाठी सहाय्यकारी ठरण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय विभाग व अधिनस्थ कार्यालयामधून ९६५ मतदार जागरूकता मंचाची स्थापना करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या सुनियोजित मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग या प्रमुख कार्यक्रमांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या मतदार जागरूकता मंचाची स्थापन करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांमध्ये निवडणूक साक्षरता निर्माण करण्यासाठी हा फोरम महत्वपूर्ण ठरणार आहे. व्होटर अवेयरनेस फोरम ही निवडणूक प्रक्रियेच्या आधारावर चर्चा आणि जागरूकता व्यक्त करण्यासाठी साधनांचे व्यवस्थापन, मतदार नोंदणी व मतदान कसे, काय आणि कुठे करायचे आदी बाबतीत मार्गदर्शन व समुपदेशन सेवा उपलब्ध करून देणारे महत्वपूर्ण माध्यम ठरू शकते, यासाठी फोरमची स्थापना करण्यात आली आहे. यासाठी जिल्ह्यातील विविध शासकीय, निमशासकीय विभागाचे प्रमुख हे या फोरमचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहेत. त्याच विभागातील अधिनस्थ् कार्यालयांसाठी सेवाजेष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आली आहे. यामध्ये त्या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व नियमीत व करारत्वावरील कर्मचारी हे सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. नोडल म्हणून निवडणूक कर्तव्याचा अनुभव असलेल्या



अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्राथमिकता देण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध विभागांतर्गत एकूण ९६५ मंच स्थापन करण्यात आले आहे. यासाठी ७९६ नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. सर्व विभागप्रमुखांनी मतदार जाणीव जागृतीसाठी सक्रिय सहभाग नोंदवून आगामी लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने या लोकशाही उत्सवात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी उत्स्फूर्तपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे.

# आदिवासी उमेदवारांना विनामुल्य स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण

**जनसंचलन/बुलडाणा**

सुशिक्षित आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, अचलपूरतर्फे शासनाच्या विविध पदासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेकरीता विनामूल्य प्रशिक्षण देण्यात देण्यात येणार आहे. याचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण कालावधी हा दि. १ एप्रिल २०२४ ते १५ जुलै २०२४ पर्यंत राहणार आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थीना दरमहा १ हजार रूपये दराने विद्यावेतन देण्यात येणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विविध विषयांच्या चार पुस्तकाचा संच विनामूल्य देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कालावधीत अटींची पूर्तता करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांचे अर्ज दि. २७ मार्च २०२४ पर्यंत सादर करावेत. यासाठी उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा, उमेदवाराचे किमान वय १८ ते ३० वर्षे असावे, उमेदवार किमान एसएससी परीक्षा उत्तीर्ण असावा, उमेदवाराचे नाव जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंदणी केलेली असावी, तसेच अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, एसएससी उत्तीर्णची गुणपत्रिका, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अर्जामध्ये स्वतःचे संपूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, प्रवर्ग, जात, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे ऑनलाईन कार्ड, .. आदी प्रती व एक पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रशिक्षणासाठी उमेदवार निवडीसाठी दि. २८ मार्च २०२४ रोजी दुपारी १२ वाजता मूळ कागदपत्रासह मुलाखतीला उपस्थित राहावे. याबाबतची निवड यादी दि. २८ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

---

# शेतकऱ्यांनी महाऊर्जेच्या फसव्या संकेतस्थळापासून सावध राहण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

महाकृषी ऊर्जा अभियान पीएम कुसुम योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांनी अवैध फसव्या संकेतस्थळापासून किंवा इतर माध्यमांपासून सावध राहावे, असे आवाहन महाऊर्जाने केले आहे. महाऊर्जामार्फत महाकृषी ऊर्जा अभियान पीएम कुसुम योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ३, ५ व ७.५ अश्वशक्ती क्षमतेचे पारेषण विरहित सौर कृषी पंप देण्यात येते. याकरीता सौर कृषी पंपासाठी पात्र लाभार्थ्यांना सौर पंपाच्या क्षमतेनुसार खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरण्यासाठीचा एसएमएस पाठवला जातो. सदर योजना राबविण्याकरीता महाऊर्जामार्फत स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी याच संकेतस्थळांचा उपयोग नोंदणी व इतर माहिती प्राप्त करण्याकरीता करावा. लाभार्थ्यांनी kusum.mahaurja.com याव्यतिरिक्त महाऊर्जातर्फे कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांचे अर्ज स्वीकारण्यात येत नाहीत. सद्यः स्थितीत वेगवेगळ्या बनावट वेबसाईट, सोशल मिडीया प्लॅटफार्म इत्यादींमार्फत शेतकऱ्यांची आर्थिक




फसवणूक करण्यात येत असल्याचे, तसेच शेतकऱ्यांना लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी खोटे संदेश पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा खोटे, फसवे संकेतस्थळ, फसवे दुरध्वनी, भ्रमणध्वनीचे संभाषण, आवाहनाला शेतकऱ्यांनी बळी पडू नये. अशा संकेतस्थळ, ॲपवर कोणत्याही पद्धतीने पैशाचा भरणा करू नये, असे आवाहन विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा अमरावती यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा कार्यालय, महाऊर्जा, अकोला दुरध्वनी क्र. ०७२४-२४५२३११ व . वर संपर्क साधावा, तसेच विभागीय कार्यालय, महाऊर्जा, अमरावती दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१६१० व . वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उष्माघातापासून बचाव करण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या काही दिवसांमध्ये तापमनात वाढ होत आहे. या वाढत्या तापमानामुळे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी नागरिकांनी उपायांचा अवलंब करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उष्माघाताची लक्षणे ही उन्हाळा सुरु झाल्यानंतर उन्हात फिरल्यामुळे डोकेदुखी, ताप, जास्त घाम येणे आणि बेशुद्ध पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे ही लक्षणे दिसून येतात. उष्माघाताची लक्षणे आढळल्यास व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवावे, व्यक्तीचे कापडे सैल करावे, त्याला द्रव पदार्थ, कैरीचे पन्हे पाजावे, तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात, बाधीत व्यक्तीला तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा. उष्माघाताची प्रौढांमध्ये शरीराचे तापमान १०४ फॅरनहाईटपर्यंत पोहोचल्यास स्नायूंचे आखडणे, मळमळणे, उलटीचा भास होणे, चिंता वाटणे व चक्कर येणे, हृदयाचे ठोके वाढणे व धडधडणे ही लक्षणे दिसून येतात. उष्माघाताची लहान मुलांमध्ये आहार घेण्यास नकार देणे, नियमीत चिडचिड होणे, लघवीचे कमी झालेले प्रमाण, कुठूनही रक्तस्त्राव होणे, तोंडाची त्वचा कोरडी होणे, डोळे शुष्क होणे ही लक्षणे दिसतात. उष्माघातामुळे त्रास झाल्यास प्रथमोपचारामध्ये त्रास झालेल्या मुला, मुलींना लगेच घरात, सावलीत आणावे, संवेदनशील राहुन त्यांचे कपडे सैल, ढिले करावेत, नळाच्या पाण्याने ओल्या केलेल्या पट्ट्या शरीरावर ठेवाव्यात, उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर वळवावे, जेणेकरून ते गुदमरून जाणार नाहीत. हवा येण्यासाठी पंख्याचा वापर करावा, पायाखाली उशी किंवा तत्सम काही ठेऊन त्यांना आडवे पडायला सांगावे, मुले जागे असल्यास वारंवार साफ आणि थंड पाण्याचे घोट पाजावेत. मुल बेशुद्ध असल्यास त्यांना खायला, प्यायला काहीही देण्याचा प्रयत्न करु नये. उष्णतेच्या लाटेदरम्यान नागरिकांनी हलके अन्न खावे, फळे आणि सलाडसारखे पचायला हलके असणारे अन्न खावे, पुरेसे पाणी प्यावे, सैल, हलके, फिक्या रंगाचे आणि सुती कपडे परिधान करावेत. गॉगल, छत्री, टोपी, बुट, चप्पल, घालूनच घराबाहेर पडावे. प्रवास करताना पाण्याची बाटली आपल्याजवळ बाळगावी. थंड पाण्याने आंघोळ करावी, घराबाहेरील उपक्रम, मैदानी उपक्रमादरम्यान थोड्या-थोड्या वेळाने विश्रांती घेत चला व विश्रांतीची वारंवारीता वाढवावी. उष्माघातापासून बचावासाठी घराबाहेर जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. सुती, मैल आणि आरामदायी कपडे घालावे. भरपूर ताजे अन्न खाल्यानंतर घरातून बाहेर पडावे. घराबाहेर जाताना डोके झाका किंवा छत्रीचा वापर करावा. पाणी, ताक, ओआरएस पाण्याचे द्रावण किंवा लस्सी, निंबुपाणी, आंबा, पन्हे इत्यादी घरगुती पेय घ्यावे. उष्माघातापासून बचावासाठी रिकाम्या पोटी घराबाहेर पडू नये. उन्हात अधिकवेळ राहू नये, तिखट, मसालेदार आणि शिळे अन्न खाऊ नये. नेहमी पाणी सोबत ठेवावे. शरीरात पाण्याची कमतरता कमी पडू देवू नये. उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीची मदत करत असताना या गोष्टीचा अवलंब करावा. संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने हलवावे. शरीराच्या जास्तीत जास्त भागावर किंवा कपड्यावर थंड पाण्याचा मारा करावा. शक्य असेल तेव्हा त्या व्यक्तीला वारा घालावा. शरीराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, गोंधळलेली, घाम येणे, घाबरलेली अशी व्यक्ती आढळल्यास टोल क्रमांक १०८ किंवा १०२ या क्रमांकावर संपर्क साधावा. जिल्ह्यातील नागरिकांनी उष्णतेच्या लाटेकडे दुर्लक्ष करू नये. उष्माघाताचे गंभीर परिणाम होतात. हे टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी व सुरक्षित राहावे. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

# सूर्यनारायण तापले, संदीपदादा संतापले! म्हणाले प्रस्थापित नेत्यांनी जिल्ह्याचे वाटोळे केले, पण आता हे चालू देणार नाही, पंधरा वर्षे काय खुर्च्या गरम केल्या?

**जनसंचलन/बुलढाणा**



आकाशातील सूर्य आता आग ओकू लागला आहे. चांगलाच तापला आहे. इकडे देऊळगाव राजा तालुक्यातील परिवर्तन यात्रेत वन बुलढाणा मिशनचे संदीप दादा शेळके चांगलेच संतापल्याचे दिसून आले. त्यांनी ठिकठिकाणच्या जाहीर सभात खासदार व जिल्ह्यातील प्रस्थापित नेत्यांचा खरपूस समाचार घेतला.

शाहू परिवाराचे अध्यक्ष यांनी रणरणत्या उन्हाची तमा न बाळगता देऊळगाव राजा तालुक्यात जाहीर सभा व कॉर्नर बैठका घेतल्या. या सभांना जनतेचा उत्साही प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना शेळके यांनी खासदार प्रतापराव जाधव यांच्यावर टीकेची तोफ डागली. तीन टर्म मध्ये काहीच न करणारे खासदार आता आपण जिल्ह्यात उद्योग धंदे आणणार, चौफेर विकास करणार अश्या गप्पा मारत आहे.मागील ५ वर्षात विका सावर न बोलणाऱ्या जाधवांना आता विकास आठवला. मग त्यांनी पंधरा वर्षात काय फक्त खुर्च्या गरम केल्या काय? असा रोखठोक सवाल त्यांनी केला. दुसरे एक नेते, त्यांनी पण अर्ज भरला. आता आमदारकी तुमची, खासदारकीचा फॉर्म ही भरला, मग इलेक्शन च कश्याला घेता? अविरोध च करून घ्याना। असा टोला त्यांनी लगावला. आता मात्र हे चालू देणार नाही सिंदखेडराजा मतदारसंघातील विकासाची हीच बाँब आहे. जिल्ह्यातील या नेत्यांनी मिळून जिल्ह्याचे वाटोळे केले, विकासाचे तीनतेरा केल्याची घणाघाती टीका संदीप दादा यांनी केली. मात्रआता ही मनमानी, दादागिरी, कमिंशन खोरी आपण चालू देणार नाही असा दमच दादांनी भरला. या सर्व निष्क्रिय नेत्यांना हद्दपार करण्यासाठी आपण लोकसभेच्या मैदानात उतरलो आहोत.जनता जनार्दन च्या आशीर्वाद ने खासदार झालो तर, जिल्ह्याचे, मतदारसंघासाचा कायापालट करू अशी ग्वाही संदीप शेळके यांनी दिली

# वाघाळा ते पोफळ शिवणी डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**



तालुक्यातील वाघाळा ते पोफळ शिवणी येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे परंतु सदर रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची तक्रार वाघाळचे सरपंच व उपसरपंच यांनी एका पत्रकाद्वारे तक्रार दाखल केली आहे त्याचा अनुषंगाने सदर रोडचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे सदर डांबरीकरण हे शासनाच्या जीआर नुसार केले नसल्याचे वाघाळचे सरपंच उपसरपंच तसेच ग्रामस्थ यांचे म्हणणे आहे याबाबत शासकीय ठेकेदार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता रोडचे काम हे पूर्ण झाले आहे अशी माहिती दिली आहे परंतु रोडवर कोणत्याही प्रकारचा बोर्ड व साईड भरलेल्या दिसून आल्या नाही व रोड सुद्धा रोडचे जे लेअर पाहिजे ते या ठिकाणी टाकलेले दिसुन आले नाही त्यामुळे सदर रोड हा मोटरसायकलच्या टायरने सुद्धा उखडून निघत आहे व पायाने सुद्धा उकरला तर निघत आहे वाघाळा गावाचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी हाताने रोड उकरून पाहिला असता सदर रोड हाताने उकारले जात आहे संबंधित ठेकेदार यांना वारंवार तोंडी तक्रारी करून सुद्धा संबंधित ठेकेदाराने कोणत्याही प्रकारची सुधारणा या रोड मध्ये केली नाही बुलढाणा जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनियर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सुद्धा समाधानकारक उत्तर दिले नाही सदर रोड मध्ये डांबर न वापरता ऑईलचा वापर केले असल्याची तक्रार सुद्धा वाघाळचे सरपंच उपसरपंच व ग्रामस्थ यांनी केली आहे वाघाळा ते पोफळ शिवणी काम हे शासनाच्या इस्टिमेट नुसार होत नसल्यामुळे सदर कामाचे वरिष्ठ पातळीवर कॉलिटी कंट्रोल यांच्याकडे सुद्धा यांनी सदर रोडची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी वाघाळा येथील सरपंच उपसरपंच व ग्रामस्थ यांनी केली आहे तसेच सदर कामाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय एकनाथरावजी शिंदे यांच्याकडे तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व अजित पवार व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे सुद्धा एका मेलद्वारे सदर रोडचे चौकशी करण्याबाबत मेल केलेला आहे तरी वरिष्ठ अधिकारी कोणती कारवाई करतात याकडे सर्व लोकांचे लक्ष लागून आहे

# आबकी बार चारशेला ब्रेक लागणार. प्रस्थापितांना लगाम लावण्यासाठी विस्थापितांची लढाई

## सप्तरंगी लढतीत सामाजिक ध्रुवीकरणात अस्लम शाह विजयी होणार-ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील.

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रस्थापितांच्या विरोधात विस्थापितांची लढाई लढण्यासाठी लोकसभेच्या रणसंग्रामात महा लोकशाही विकास आघाडीचा अधिकृत उमेदवार म्हणून असलम शाह हसन शाह यांची उमेदवारी ३० मार्चला पत्रकार परिषदेच्या माध्यमातून चे संयोजक ॲड सतीशचंद्र रोठेंनी जाहीर केली आहे. ईव्हीएम, एनआरसी, सीएए, महागाई,भारतीय निवडणूक आयोग, बेरोजगारी, धर्मवाद जातिवाद, शिक्षण, अदानी अंबानी, खाजगीकरण यासह विकासात्मक कार्यावर महायुती महाआघाडीच्या उमेदवारांनी बोलावे. या राष्ट्रीय मुद्द्यांसह जिल्ह्यातील हकूमशाही, दादागिरी, स्वगृही अधिकारी,अनधिकृत व्यवसाय, शेतकऱ्यांची व्यथा, रोही रानडुक्कर,क्राईम रेट, व्यसनाधीनता, यावर चिंता व्यक्त करीत लोकप्रतिनिधींची दिशाभूल करणारी वक्तव्ये यावरही सडेतोड भूमिका जाहीर केली आहे. हा तर टेलर आहे २६ एप्रिल पर्यंत दैनंदिन पुराव्यानिशी एक पिक्चर आम्ही दाखविणार आहोत. त्यामुळे प्रस्थापित उमेदवारांना जनतेसमोर जाणेही कठीण होईल. त्यामुळे महाराष्ट्रात तरी आबकी बार चारशे पारला ब्रेक लागेल. केंद्रातही सत्तांतर होईल असा विश्वासही यावेळी रोठेंनी व्यक्त केला. चे विदर्भातील सर्व उमेदवार दोन एप्रिल ला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील परिस्थिती पाहता महायुती, महाआघाडी,वंचित व अपक्ष सर्व उमेदवार सामाजिक मतांचे ध्रुवीकरण करत आहेत. तर बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवार मराठा हिंदू आहे. सर्व सारख्या ताकदीचे असल्यामुळे सप्तरंगी लढत बुलढाणा लोकसभा मतदारसंघात होणार आहे. तर या सामाजिक ध्रुवीकरणाच्या सप्तरंगी लढतीमध्ये सर्वात मोठ्या महा लोकशाही विकास आघाडीचे मुस्लिम समाजाचे एकमेव उमेदवार असल्यामुळे त्यांचा विजय जवळपास निश्चित झाल्याचा अंदाज रोठेंनी यावेळी व्यक्त केला. महायुती आणि महाआघाडीच्या दांभिक वल्गना आणि दिशाभूल करणाऱ्या राज्यकर्त्यांना सामान्य नागरिक विटला आहे. त्यामुळेच एक सक्षम पर्याय म्हणून महा.राष्ट्र विकास आघाडी, भारत मुक्ती पार्टी, आझाद हिंद शेतकरी संघटना, लोकशाही संघर्ष, राष्ट्रीय स्वाभिमान पक्ष, राष्ट्रीय बहुजन पार्टी, रिपब्लिकन पार्टी, एकलव्य पार्टी,भारत सुराज्य पार्टी ,अशा बारा राष्ट्रीय रजिस्टर अनरेकग्नाईस पक्षांच्या महा गटबंधनातून महा लोकशाही विकास आघाडी अण्णाराव पाटील यांच्या मुख्य संयोजनात स्थापित झाली आहे. बामसेफचे राष्ट्रीय अध्यक्ष मुलनिवासी वामन मेश्राम, वंचित बहुजन आघाडीचे बाळासाहेब आंबेडकर, मराठा क्रांती मोर्चाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याशी आघाडीची चर्चा सुरू असून दोन एप्रिल ला आणखी काही पक्ष संघटना मध्ये सामील होणार आहे. तर प्रथम यादीत जाहीर झालेल्या सर्व पक्षांचे व महा लोकशाही विकास आघाडीचे उमेदवार जैसे थे राहुन दुसऱ्या यादीतील उमेदवारांची घोषणा सामूहिकरीत्या होणार आहे. आझाद हिंद शेतकरी संघटनेने कार्य आणि पद्धत जिल्हा सह महाराष्ट्रातील शेतकरी महिला नागरिक यांना माहित आहे.

# हार्डवेअरमधील गल्ल्यातून चोरट्याने केली रक्कम लंपास

**जनसंचलन/ शेगाव**



शेगाव आठवडी बाजारातील न्यू सागर हार्डवेअर दुकानातील गल्ल्यातून रक्कम लंपास केल्याची घटना २८ मार्च रोजी घडली. याबाबत सागर गजानन हुसे वय ३३ रा. संविधान चौक यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली की, हार्डवेअर मधील सीसीटीव्ही नेहमी प्रमाणे चेक केले असता अज्ञात इसम अंगात काळ्या रंगाचे टी शर्ट व अंगावर महाकाल नाव असलेला रूमाल व १२ वर्षाचा मुलगा हा सीसीटीव्ही फुटेजमध्ये माझे दुकानाच्या गल्ल्यातील पैसे चोरतांना दिसून आला. त्यांनतर फिने गल्ल्यात ठेवलेले पैसे चेक केले असता फिला अंदाजे ३००० रू हे दिसुन आहे. (श.प्र.) आले नाही. तसेच प्रविण सुरेश घाटोळ रा. सावता चौक शेगाव यांचे सुध्दा अब्दुल हमीद चौक शेगाव येथे गौरी हार्ड वेअर नावाचे दुकान असुन त्या दुकानात सुध्दा १६ मार्च रोजी ३.३० वाजता वरील अनोळखी इसमाने दुकानातील गल्ल्यातील अंदाजे ५००० रू चोरून नेले आहे. तरी वरील अनोळखी इसमाने फिचे न्यु सागर हार्डवेअर दुकानातुन अंदाजे ३००० रू तसेच गौरी हार्डवेअर नावाचे दुकान व गौरी हार्डवेअर नावाचे दुकानातील गल्ल्यातील अंदाजे ५००० रू चोरून नेले आहे. असे एकूण ८००० रू चोरून नेले आहे अशा तोंडी रिपोर्ट वरून कलम कलम ३८० भादवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958